आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – संध्या ७ वाजता

५ ऑक्टोबर २०२३ – गुरुवार

**ठळक बातम्या**

- राज्यातल्या सर्व जिल्ह्यातल्या शासकीय रुग्णालयांचा अहवाल तातडीनं सादर करण्याचे मुख्यमंत्र्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश

- नांदेड आणि संभाजीनगर जिल्हा रुग्णालयातल्या मृत्यू प्रकरणी ४ आठवड्यात अहवाल सादर करण्याचे राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे आदेश, नांदेडच्या अधिष्ठात्यांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

- चित्रपट प्रदर्शनासाठीचे प्रमाणपत्र देण्यासाठी लाच मागितल्या प्रकरणी सेन्सॉर बोर्डाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांसह तिघांविरोधात सीबीआयकडून गुन्हा दाखल

- MPSC च्या अध्यक्षपदी रजनीश सेठ यांची नियुक्ती

**आणि**

- एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेला आजपासून सुरुवात

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी शासकीय रुग्णालयांना तात्काळ भेटी द्याव्यात, आणि जिल्ह्यातल्या सद्यस्थितीचा अहवाल तातडीनं सादर करावा, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. त्यांनी आज सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद साधून राज्यातल्या आरोग्य सुविधांचा आढावा घेतला.

नांदेड आणि घाटी इथल्या रुग्णालयांमध्ये झालेल्या मृत्यू प्रकरणाच्या चौकशीसाठी राज्यस्तरीय समिती नेमली असून दोषींवर कडक कारवाई केली

जाईल, असा इशाराही शिंदे यांनी यावेळी दिला. औषध खरेदीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांनाही दिले आहेत. त्यामुळे औषध खरेदीत विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी, यापुढं जिल्हाधिकाऱ्यांनी नियमितपणे शासकीय रुग्णालयांना भेटी द्याव्यात, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन आराखडा तयार करण्याचे काम राज्य सरकार करत असून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**<><><><><>**

राज्यातल्या या घटनांची स्वतःहून दखल घेत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं राज्य शासनाच्या मुख्य सचिवांना नोटीस बजावली आहे. चार आठवड्यांत या प्रकरणाचा सविस्तर अहवाल द्यावा, असं त्यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

नांदेड शासकीय रुग्णालयात गेल्या काही दिवसात मृत्यू झालेल्यांची संख्या आता ४१ वर पोहोचली असून यात तब्बल २२ बालकांचा समावेश आहे. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात आलेल्या तक्रारावरुन, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, आणि रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एस.आर. वाकोडे यांच्यासह बालरोग विभागातल्या डॉक्टरवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिष्ठाता आणि बालरोग विभागातल्या डॉक्टरांनी जाणीवपूर्वक उपचाराकडे दुर्लक्ष केलं. त्यामुळे माय-लेकाचा मृत्यू झाल्याचं या तक्रारीत म्हटलं आहे.

**<><><><><>**

आरोग्यासह राज्यातल्या विविध समस्या हाताळण्यात शिंदे सरकार पूर्णपणे अपयशी ठरलं असून, या प्रश्नांबाबत चर्चा करण्यासाठी विधीमंडळाचं दोन दिवसाचे विशेष अधिवेशन बोलवावं, अशी मागणी काँग्रेसनं केली आहे. विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या शिष्टमंडळानं आज राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेऊन याबाबत निवेदन दिलं.

शासकीय रुग्णालयांमधल्या मृत्यूंप्रकरणी  वैद्यकीय शिक्षण मंत्री आणि आरोग्य मंत्र्यांना बडतर्फ करावं, मृत व्यक्तिंच्या कुटुंबांना प्रत्येकी दहा लाख रुपयांची मदत द्यावी, शासनसेवेतली पदं कंत्राटी स्वरुपात भरण्याचा शासननिर्णय तात्काळ रद्द करावा, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर उपाययोजना करण्याबाबत शासनाला निर्देश द्यावेत, राज्यात बिघडलेल्या कायदा आणि सुव्यवस्थेबाबत राज्यपालांनी बैठक घेऊन लक्ष घालावं, अशा मागण्याही या निवेदनात केल्या आहेत.

**<><><><><>**

शेतक-यांना पतपुरवठा करण्यासाठी सहकारी संस्था असणं आवश्यक आहे. या संस्थांची स्थिती मजबूत करण्याचे ध्येय शासनानं ठेवलं आहे. केंद्र शासनाच्या मदतीने या संस्थांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे सहकारी संस्थांना अवसायनात काढण्यास स्थगिती देण्यात आली आहे. शासनाच्या आदेशाशिवाय संस्था अवसायनात काढू नये, असे निर्देश पालकमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी दिले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत, कोविड काळातल्या ज्या शेतकऱ्यांची नुकसान भरपाई देय आहे, ती ८ दिवसात द्यावी, अन्यथा नियमानुसार होणाऱ्या

कारवाईची केली जाईल, असा इशारा कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी पिक विमा कंपन्यांना दिला आहे. याबाबत काही पिक विमा कंपन्यांकडून विलंब होत असल्यानं, त्याबाबत आढावा घेण्यासाठी आज मुंबईत आयोजित बैठकीत ते बोलत होते.

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या नागरिकांनी पीएम विश्वकर्मा योजनेचा लाभ घेऊन स्वतःची आर्थिक प्रगती साधावी  असं आवाहन केंद्रीय सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे यांनी केलं आहे. ते आज सिंधुदुर्ग नगरी इथं पीएम विश्वकर्मा योजनेचा प्रचार करण्यासाठी आयोजित परिसंवादामध्ये बोलत होते.

<><><><><>

चित्रपट प्रदर्शनासाठी आवश्यक प्रमाणपत्र देण्याकरता लाच घेतल्याप्रकरणी सीबीआयनं काही जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. यात ३ व्यक्ती आणि CBFC, अर्थात केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाच्या काही अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. हिंदीत डब करण्यात आलेल्या एका चित्रपटाला सप्टेंबर २०२३ मध्ये सेन्सॉर बोर्डाकडून प्रमाणपत्र मिळवण्यासाठी ७ लाख रुपयांची लाच स्वीकारल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. याप्रकरणी मुंबईसह ४ ठिकाणी सीबीआयनं छापे टाकले असून काही कागदपत्र गोळा केली आहेत.

<><><><><>

साहित्यक्षेत्रातला नोबेल पुरस्कार यंदा नॉर्वेतले थोर साहित्यिक- नाटककार जॉन फोस यांना जाहीर झला आहे. मूक भावना व्यक्त करणाऱ्या त्यांच्या लिखाणाबद्दल त्यांची निवड पुरस्कार समितीने केली आहे. हेन्रिक इब्सेनच्या खालोखाल जॉन फोस यांच्या नाटकांचे प्रयोग रंगमंचावर झाले आहेत. दैनंदिन

व्यवहारातल्या प्रसंगांमधून मानवी भावनांचं सशक्त चित्रण त्यांच्या लेखनात असतं असं नोबेल पुरस्कार समितीने म्हटलं आहे.

<><><><>

राज्याचे विद्यमान पोलिस महासंचालक रजनीश सेठ यांची राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपाल रमेश बैस यांच्या मंजुरीनंतर यासंदर्भातलं राजपत्र आज प्रसिद्ध झालं.

<><><><>

राष्ट्रवादी काँग्रेसमधल्या फुटीसंदर्भात उद्या दुपारी केंद्रीय निवडणूक आयोगासमोर सुनावणी होणार आहे. अजित पवार गटाने निवडणूक आयोगाकडे पक्षाचे निवडणूक चिन्ह मिळावे आणि अधिकृत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून मान्यता मिळावी, यासाठी अर्ज केला आहे. या दाव्याला शरद पवारांसोबत असलेल्या गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी विरोध केला आहे.

<><><><>

कपडे धुण्यासाठी तलावावर गेलेल्या एकाच कुटुंबातल्या तीन शाळकरी मुलांचा तलावात बुडून मृत्यू झाला. अहमदनगर जिल्ह्यातल्या खर्डा इथं आज ही घटना घडली. आई-वडिलांना कपडे धुवायला मदत करण्यासाठी ते तलावावर गेले होते. पाण्यात पडलेल्या मुलीला वाचवण्याच्या प्रयत्नात तिच्यासह दोन्ही भावांचा मृत्यू झाला.

<><><><>

एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेला आजपासून सुरुवात झाली. अहमदाबादमध्ये सुरू असलेल्या इंग्लडनं न्युझीलंडपुढं विजयासाठी २८३ धावाचं आव्हान ठेवलं आहे. न्युझीलंडनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला.

इंग्लंडनं निर्धारित ५० षटकात ९ गडी गमावून २८२ धावा केल्या. शेवटची बातमी हाती आली, तेव्हा न्युझिलंडच्या १२ षटकात १ बाद ९९ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

'मेरी माटी मेरा देश अर्थात माझी माती माझा देश' या उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात, आज ५ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजी नगर महापालिका मुख्यालय इथं शहरातील सर्व प्रशासकीय विभागातल्या घरा घरांमधून माती संकलित करण्यात आली. सर्व अमृत कलश मनपा मुख्यालयात आणण्यात आले. त्यानंतर मनपा मुख्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत वाजत गाजत कलश यात्रा काढण्यात आली.

<><><><><>

राज्यात ५ जानेवारी २०२४ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदार यादीपूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण न झालेल्या युवकांना आता आगाऊ मतदार नोंदणीची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. अशा ६० हजार ७४८ जणांचं एक जानेवारीनंतर, वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर, त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट केलं जाणार आहे.

<><><><><>

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं २१ सुवर्ण, ३१ रौप्य आणि ३२ कांस्य पदकांसह एकूण ८४ पदकांची कमाई केली आहे. तिरंदाजीमध्ये, भारतीय पुरुष संघानं कंपाऊंड तिरंदाजीच दक्षिण कोरियाचा पराभव करून सुवर्णपदक पटकावलं. यापूर्वी ज्योती, परनीत आणि आदिती यांनी महिलांच्या सांघिक कंपाऊंड स्पर्धेत चीनच्या संघावर विजय मिळवत सुवर्णपदक जिंकलं.

स्क्वॉशमध्ये भारतीय मिश्र दुहेरी जोडी दीपिका पल्लीकल आणि हरिंदर पाल सिंग संधू यांनी मलेशियाच्या जोडीला हरवून सुवर्णपदक जिंकलं.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकणात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून राज्याच्या उर्वरित भागात हवामान कोरडं राहील, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

//<><><><><>//